# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**मुख्य कार्यालय :** चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१६५/२२५० /२०२५ दि.२८/०७/२०२५

२५६ २८/०७/२०२५

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) क्र.१७९८/२०१६ दि. ०४/११/२०१६.
२) सुधारित बांधकाम परवानगी (मूळ CC) क्र. १६७१/२०२३, दि. ०७/०९/२०२३.
३) विकसक यांनी केलेला अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा पत्र दि. ०६/०५/२०२५.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **मौजे पर्वती, पुणे, फा.प्लॉ.क्र.५७१ब, (स.नं. १२९) लडकतवाडी** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून क्र १६७१, दि. ०७/०९/२०२३ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देणेत आली आहे. मंजूर बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील पुनर्वसन घटकाचे बांधकाम पूर्ण झाल्याने, योजनेचे विकसक यांनी उपरोक्त वाचा ३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रस्ताव प्राप्त आहे. योजनेच्या वास्तूविशारद यांनी पुनर्वसन घटकाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले असल्याने, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या इमारतीमधील पूर्ण झालेल्या मजल्यांना पार्कींगसह मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार इमारतीस अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**विक्री घटक :- ०५ दुकाने**

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका/दुकाने |
|---|---|---|---|
| १) | लोअर ग्राउंड मजला | दुकान क्र. ०७,०८,०९,१०,११ | ०५ दुकाने |
| | **एकूण** | | **०५ दुकाने** |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**अटी:-**

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कारवाई करण्यात येईल.

२) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

४) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) दि.२३/०२/२०२४ रोजीच्या अग्निशमन विभागाकडील अंतिम ना- हरकत प्रमाणपत्रामधील सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) लिफ्टस, STP, Fire hydrant, Generator backup system व Water pumping इ.बाबत विकसकाने त्यांच्या खर्चाने ५ वर्षाकरिता वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक राहील.

८) विषयांकित योजना आरक्षणाखालील क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

९) "प्राथमिक शाळेच्या" आरक्षण अंतर्गातील ४०% क्षेत्र ६१०.८६ चौ.मी अद्याप विकसाने पुणे महानगरपालिकेला हस्तांतरीत केल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. तरी सदरचे क्षेत्र अंतिम टप्यातील १०% टीडीआर मागणी पूर्वी पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत विकसकाने दि.०८/०७/२०२५ रोजीच्या पत्रासोबत प्रतिज्ञापत्र सादर केले असून सदर प्रतिज्ञापत्रस अधिन राहुन अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

१०) प्रस्तुत गृहनिर्माण प्रकल्पाकरीता सक्षम प्राधिकाऱ्याने पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिका हस्तांतरण करणेपूर्वी पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे विकसकावर बंधनकारक राहील.

११) **मौजे पर्वती, पुणे, फा.प्लॉ.क्र.५७१ब, (स.नं. १२९) लडकतवाडी** या झोपडपट्टी योजनेच्या अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि. १८/०७/२०२५ रोजीचे मान्यतेने**

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

**सहायक संचालक नगररचना,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १. **विकसक मे. केदार असोसिएट्स**
८१०,ए बिल्वकुंज अपार्टमेंट, फ्लॅट क्र.०५,भांडारकर रस्ता, पुणे -४११००४
२.**वास्तुविशारद** -ओंकार असोसिएट्स
२ तृप्ती अपार्टमेंट, रंजित हॉटेलसमोर, भांडारकर रोड, पुणे.
३. तहसिलदार, ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा., पुणे.